नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १७/०५/२०२२ (मंगळवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. केळवद** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौजा खानगाव शिवार येथे दिनांक १५.०५.२२ चे १७.०० वा. ते दिनांक १६.०५.२२ चे १२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— विलास विठ्ठलराव गुडधे, वय ४६ वर्ष, रा. सटवा माता मंदीर परीसर बस स्टॉप मागे सावनेर ता. सावनेर जि. नागपुर यांचे मौजा खानगाव गावाला लागून असलेला शेतातील गोठ्याच्या समोर झाडाच्या खाली सावलीत बांधून ठेवलेले जनावरे एकुण ५ गावरानी व जर्सी गायी असा एकुण किंमती ५७,०००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अमर झिने मो. नं. ८१८०९७५१२५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे दिनांक १६.०५.२२ चे १२.०० वा. ते १४.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— ग.भा. यशोधरा रणविर सुखदेवे, वय ५४ वर्ष, रा. चंद्रमणी नगर, रामेश्वरी रोड नागपूर ही बुध्दपोर्णिमा असल्याने परीवारासह विक्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे दर्शनासाठी गेली होती. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने तिच्या गळयात असलेला सोन्याचा गोफ व त्यात लॉकेट असा एकुण किमती ३०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार राजु गोमकर मो.क्र. ९८२३९८०४७२हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर